# वसई विरार शहर महानगरपालिका इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटी

**मुख्य कार्यालय विरार (पूर्व) ता. वसई, जि. ठाणे**

**थेट मुलाखती (Walk in Interview)**

**जावक क्र. वविशम/रक्षदुका/०२/२०२१** **दिनांक : १२/०१/२०२१**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र क्षयरोग कार्यालयासाठी खालील अस्थायी स्वरूपातील पदे करारपद्धतीने ११ महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात करार तत्त्वावर भरावयाची आहेत. याकरिता विहित अर्हताप्राप्त उमेदवारांच्या थेट मुलाखती (Walk in Interview) आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीसाठी शुक्रवार, दि. २२/०१/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. वसई- विरार शहर महानगरपालिका, पापड खिंड डॅम, फुलपाडा, विरार (पूर्व) येथे आवश्यकत्या प्रमाणपत्र/ कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित सत्यप्रती दोन पासपोर्ट साईज फोटोसह व विहित नमुन्यातील अर्जासह उपस्थित रहावे. सदरची जाहिरात अर्जाचा नमुना वसई-विरार शहर महानगरपालिका www.vvcmc. in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | पदनाम | एकूण पद संख्या | जात प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | प्राधान्यक्षम पात्रता | मानधन प्रतीमाह |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्षयरोग आरोग्य कार्यकर्ता | ३ | अ. जमाती-२<br>खुला - १ | १) सरकारमान्य MSW अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>२) TBHV चा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>३) संगणकप्रणाली संबंधीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण (कमीत कमी २ महिने) | १) बहुद्देशीय आरोग्य कार्यकर्त्यांचे शासनमान्य प्रशिक्षण पूर्ण.<br>२) स्वच्छता निरीक्षक पदाचा शासनमान्य अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>३) संबंधित पदनिहाय कामांमध्ये कमीतकमी १ वर्षाचा अनुभव. | मासिक ठोक वेतन १५,५००/- (रु. पंधरा हजार पाचशे मात्र) |
| २ | जिल्हा पी. पी. एम. समन्वयक (public private mix co-ordinator | १ | खुला - १ | १) सरकारमान्य MSW अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा सरकारमान्य समाजशास्त्र या विषयातून पदव्युत्तर पदवी.<br>२) Communication/ACSM/public private artnership/ Health/projects/programs मध्ये कामाचा १ वर्षाचा अनुभव.<br>३) दुचाकी वाहनचालक परवाना व दुचाकी वाहन चालविता येणे आवश्यक<br>४) संगणकप्रणाली संबंधित प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण (कमीत कमी २ महिने) | १) संबंधित पदनिहाय कामामध्ये कमीत कमी २ वर्षाचा अनुभव | मासिक ठोक वेतन २०,०००/- (रु. वीस हजार मात्र) |
| ३ | वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक (STS) | ४ | अ. जमाती - १<br>अ. जाती -१<br>वि. जा./भ.ज (ब)/भ.ज. (क)/भ.ज. (ड) -१<br>खुला -१ | १) कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२) मराठी ३० शब्द प्रतीमिनिट टायपिंग व इंग्रजी ४० शब्द प्रतीमिनीट टायपिंगसोबत संगणकप्रणाली संबंधित प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण (MS-CIT) कमीतकमी २ महिने<br>३) दुचाकी वाहन चालक परवाना व दुचाकी वाहन चालविता येणे आवश्यक. | १) TBHV चा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>२) समाजकार्य किंवा वैद्यकीय समाजकार्य या विषयाची सरकारमान्य पदवी/पदविकाधारक<br>३) बहउद्देशीय आरोग्य कार्यकर्त्यांचे शासनमान्य प्रशिक्षण पूर्ण.<br>४) संबंधित पदनिहाय कामांमध्ये कमीतकमी १ वर्षाचा अनुभव. | मासिक ठोक वेतन २०,०००/- (रु. वीस हजार मात्र) |
| ४ | वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक (STLS) | १ | अ. जाती -१ | १) शासनमान्य संस्थेचा वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदविका धारक<br>२) संगणकप्रणाली संबंधित प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण (कमीत कमी २ महिने)<br>३) दुचाकी वाहन चालक परवाना व दुचाकी वाहन चालविता येणे आवश्यक. | १) संबंधित पदनिहाय कामामध्ये कमीत कमी १ वर्षाचा अनुभव. | मासिक ठोक वेतन २०,०००/- (रु. वीस हजार मात्र) |
| ५ | औषध निर्माता | १ | खुला -१ | औषध निर्माता पदवी/पदविका | नामांकित रुग्णालय/ शासनमान्य आरोग्य केंद्रात औषधसाठा व्यवस्थापन करण्यासाठी १ वर्ष कामाचा अनुभव | मासिक ठोक वेतन १७,०००/-(रु. सतरा हजार मात्र) |

**अर्जसोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्राची १ सत्यप्रत.
२) शाळा सोडल्याच्या दाखल्याची १ सत्यप्रत.
३) रहिवासी दाखल्याची १ सत्यप्रत.
४) अनुभवाच्या दाखल्याची १ सत्यप्रत
५) उमेदवाराचा नजीकच्या काळातील १ रंगीत फोटो (रुंदी ३.५ सेंमी व उंची ४.५ सेंमी आकाराचे)
६) दुचाकी वाहनाचा परवाना (आवश्यक पदांसाठी)

**विशेष सूचना :**

१) वरीलप्रमाणे देण्यात आलेली वयोमर्यादा ही Interview रोजीची गणली जाईल.
२) नेमणूकीबाबत वसई विरार शहर महानगरपालिका इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटीचा निर्णय अंतिम राहील.
३) सदरची पदे संपुर्णपणे अस्थायी स्वरूपाची ११ महिन्यांच्या कालावधीसाठी असून करार पद्धतीने अस्तित्वात राहतील. निवड झालेल्या उमेदवारास वसई विरार शहर महानगरपालिका इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटीबरोबर विहित नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.
४) सदरची नियुक्ती ही पूर्णपणे ठोक मानधनावर आहे. भविष्यात कायमस्वरूपी नेमणूक होणेबाबत मा. न्यायालयात दाद मागता येणार नाही.
५) वसई विरार शहर महानगरपालिका इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटी नेमून दिलेल्या ठिकाणी काम करणे बंधनकारक राहील.
६) तक्यात दर्शविलेल्या पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो.

**सही/-**
आयुक्त तथा अध्यक्ष,
वसई विरार शहर महानगरपालिका,
इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटी

**स्थळ : विरार**

**जा. क्र. वविशम/०२/दि. १२/०१/२०२१**